# राशिभविष्य - एप्रिल, २०१२.

दादा दामले **(DADADAMLE@GMAIL.COM)**

**(१)** मेष - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ बराचसा प्रतिकुल असा असणार आहे. सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे मनावर संयम ठेवून व सहन शील बनून आचरण केलेत तरच गुरुकृपेने शारीरिक आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही; व शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक जीवनात सुखसमाधान लाभू शकेल. संततीसुखाचे दृष्टीनेही काळ प्रतिकुलच असल्याचा अनुभव येईल. मुलांचे आजारपण किंवा आचरणविषयक समस्या यामुळे त्रस्त व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये.
दांपत्यजीवनातही जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य समस्येमुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. काहींना कुमार्गी मित्रांमुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, तर काहींना आर्थिक घोटाळे, आर्थिक लाभात होणारा विलंब अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता करावी लागेलसे दिसते. या राशीचे विद्यार्थी कुमार्गी मित्रांपासून दूर राहिले तरच हाती घेतलेल्या अध्ययनात प्रगती करू शकतील. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक होईल. या राशीच्या ज्या मंडळींना सहज वाममार्ग धन मिळविणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. जपा.

**(२)** वृषभ - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काही साधावयाचे ते साधून घेण्याचा प्रयत्न करावा. शास्त्रीय संशोधन, मानसिकरोगतज्न्य, द्रव पदार्थ विक्रेते, वकिली-सल्लागारी व्यवसाय, हिशेब असे व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक-मानसिक अनारोग्य व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. कौटुंबिक जीवनातही गैरसमज, वाद, राहत्या जागेसंबंधी वा स्थावराबाबत समस्या त्रस्त करतील. श्रद्धा असेल तर भगवान शंकराची उपासना अनुकुल होईल. वाहन अपघात योग संभवतो.जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक सुखसमाधान प्राप्त होईल. तसेच सामाजिक कार्यात कार्यरत असणारांनाही काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल.. या राशीच्या चिकित्सक बौद्धिक अध्ययनक्षेत्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. मात्र मित्रांशी मतभेद, भांडणे टाळणे अगत्याचे होईल. गैरसमज, अनारोग्य अशापैकी कारणाने दांपत्यजीवनातही अपेक्षित सुख मिळेलसे वाटत नाही.

**(३)** मिथुन - लहरी स्वभावावर नियंत्रण ठेवू शकतील तर या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ खूपच अनुकुल व सुखसमाधान देणारा असाच सिद्ध होईल. शासकीय, निमशासकीय नोकरदार मंडळींना, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक

व्यवसाय, शास्त्रीय संशोधन क्षेत्र, उच्च बौद्धिक व्यवसाय क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र वकिली-सल्लागारी असे नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच असेल. या राशीच्या व्यापारी मंडळींना परधर्मीय ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. तसेच या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. मात्र संततीचे आजार व अन्य कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभेलसे दिसत नाही. अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक उपासनेत  प्रगती साधणे सहज शक्य होईल. काहींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनयोग येऊ शकेल.

**(४)** कर्क **-** या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल.शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना, चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना दलाली-कमिशनवर व्यवसाय करत असणारांना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल; तर या राशीच्या काही भाग्यवंतांना मानसन्मान प्राप्त होणेही शक्य दिसते. मात्र महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी आर्थिक समस्या निर्माण होण्याची शक्यता दिसते. अपेक्षित अर्थसाहाय्य मिळविण्यासाठी खूप श्रम व दगदग सहन करावी लागेल. तसेच काही मंडळींना मानसिक ताण सहन करावा लागून  मानहानी सहन करावी लागण्याची  शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान, दाढा यांपैकी कसले तरी असह्य दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता आहे.. कौटुंबिक जीवनातही दु:ख, निराशा, चिंता, मतभेद अशापैकी कारणांनी बाधा उत्पन्न झाल्यामुळे गृहसौख्य मिळणेही कठिण होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. जलभय व विषभय आहेच. जपा.

**(५)** सिंह **-** मानापमान फ़ार आणि हट्टी स्वभाव यामुळे या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात अकारण कठिण परिश्रम व दगदग सहन करावी लागणार आहे. त्यातूनच कमीअधिक प्रमाणात मानसिक ताण येऊन शारीरिक-मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकेल. जपा. अहंकारी स्वभावाला आवर घाला, नोकरीत वरिष्ठांशी नम्रतेने वागा,   काळ अनुकुल नाही हे ध्यानात ठेवून सतत मनावर संयम ठेवून सहनशील होऊन आचरण केलेत तर खूपच सुखाचे होईल.  " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " हे तुकोबांचे वचन ध्यानात घेऊन वाटचाल करा. त्यामुळे घरचे वातावरणही प्रसन्न व शांत राहील.  तसेच स्वत:चे व कुटुंबियांचे सर्व प्रकारचे आरोग्यही फ़ारसे बिघडणार नाही. वकिली-सल्लागारी व्यवसाय, हिशेब, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ

अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. अध्यात्मिक जीवनात रस असणारांना सात्विक सुखशांती लाभेल. तांत्रिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ इतरांपेक्षा अनुकुल व सुखावह होईल. वैवाहिक व कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, अनारोग्य अशापैकी कारणांनी वातावरण तंग राहणे संभवते. जपा. शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे व कालगतीनुसार सर्व काही ठीक होईल.

**(६)** कन्या **-** शनिदेवांच्या साडेसातीचा अखेरचा अडीच वर्षांचा काल अद्याप बाकी आहे. त्यामुळे उदास, निराश न होता घट्ट मनाने व सावधानतेने तसेच सहनशीलतेने आचरण करा. नवीन उलाढाल्या अजिबात करू नका. पण भावी अनुकुल काळाचा लाभ उठवण्यासाठी योजनांचा आराखडा तयार करण्यास हरकत नाही. पेरून ठेवा, वेळ परिपक्व झाली की आपोआप उगवेल. काही जुन्या, दबलेल्या प्रकरणाचा त्रास होणे संभवते. तसे घडले तर त्याला धीराने तोंड द्या. त्यामुळे मानसिक आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. या राशीच्या काहींना पोटाचे विकार, अपचन, तर काहींना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. दाम्पत्यजीवनातही समजूतदारपणे आचरण करून गैरसमज दूर केलेत तर खूपच सुखाचे होईल व जीवनसाथीचे सर्व प्रकारचे आरोग्यही बिघडणार नाही.

तसेच कुटुंबात काही अनिष्ट घडणेही टळू शकेल. कोर्ट प्रकरणे व काही आर्थिक देणेघेणे व्यवहार असतील तर आर्थिक चिता होणे संभवते. राहू, शनि, मंगळ व रवि हे चार दादा ग्रह प्रतिकुल असल्यामुळे मनाने व विचाराने शांत राहून जे जे होईल ते ते पाहावे व हरि ठेविल तैसे राहावे " अशा पद्धतीचे आचरणच सुखावह होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी तर कोणत्याही प्रकारचे गैरसमज व संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी. काल्पनिक चिंता करू नका. उगीचच आजारभावना मनातून काढून टाका. अशाही परिस्थितीत ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांना तसा लाभ होणे संभवते.

**(७)** तुळा **-** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय भावनाशील झाले असले पाहिजे. त्यामुळे थोडेही काही मनाविरुद्ध घडले तर लगेच नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत अध्यात्माची मनापासून ओढ असेल तर उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. चिकित्सक बौद्धिक, शास्त्रीय संशोधन व कलात्मक व्यवसाय असणारांनाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध व्यापारी मंडळींना लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने नवे स्नेहसंबंध जुळून येतील व जुने प्रेमसंबंध दृढ होतील. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह संपन्न होतील. शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काहींना धनलाभ तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. तसेच

काहींना मानसन्मानाचे योग येतील तर काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र अतिशय कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. पण मित्रांशी भांडणे करून मैत्रीत बाधा निर्माण करू नका. कौटुंबिक जीवनात अनारोग्य, वाद, गैरसमज, कोणा प्रिय व्यक्तीचे नोकरीमुळे, विवाहामुळे घरातून दूर जाणे अशापैकी कारणांनी अस्वस्थ परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दिसते. जपा.

**(८)** वृश्चिक **-** शनिदेवांच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी विशेष करून सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करावेत. नपेक्षा फ़सवणूक, मानहानी होऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व सर्व कलात्मक व्यवसाय असणारांना, ललित साहित्यिकांना नव साहित्यनिर्मितीस काल अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. पूर्वार्धात वरिष्ठांचा विरोध, त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळींच्या व्यवसायात खळबळजनक
घटना घडतील. या राशीच्या युवा पिढीला काही नवीन उद्योग सुरू करण्याची ऊर्मी येईल. काहींना व्यावसायिक जबाबदाऱ्यांचा असह्य ताण सहन करावा लागेल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य प्रकारच्या त्रासामुळे दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच गृहसंबंधी व्यवहारात घोटाळे, गैरसमज होऊन गृहशांतिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे; पण सर्व प्रकारचे आरोग्य साभाळून मनापासून अध्ययन करणे जमले पाहिजे. या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा तर काहीना त्वचाविकाराचा त्रास होईलसे दिसते.

**(९)** धनु **-** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय भावनाशील झाले असले पाहिजे..त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही घडले तरी मन अस्वस्थ होत असल्र पाहिजे. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, वकिली व्यवसाय, शास्त्रीय संशोधन अशा कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायी व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. मात्र प्रवास सावधानतेने करा. त्रास व मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात
रवि-हर्षलमुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक भांडणे, मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. काहींना वाढत्या खर्चाच्या चिंतेने ग्रासले जाण्याची शक्यता आहे. मन अस्वस्थ असल्यामुळे कोणाशीही न पटणे, कशातही सुखसमाधान न वाटणे, आहे त्यात समाधान नसणे, त्यामुळे वास्तुसुख व गृहसौख्य न

लाभणे अशापैकी घडण्याची शक्यता दिसते. बुधामुळे काही प्रमाणात मित्रसुख लाभले तर गृहसौख्यही लाभू शकेल. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी अनारोग्यामुळे दाम्पत्यजीवनातील सुखसमाधानात बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे विचित्र आचरण, कोणाचे अध्ययनाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येऊ शकेल. एकंदरीत पाहता या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ विशेष असे काही न घडणारा असाच असल्याचा अनुभव येईल.

(१०) मकर - नोकरी-व्यवसाय कोणताही असो, या राशीच्या मंडळींना या महिन्याचे दिनांक ७-८-९ हे तीन दिवस अविस्मरणीय असे अनुकुल/प्रतिकुल अनुभव देणारे सिद्ध होतील, असे वाटते. तसे अनुभव आल्यास कळवा. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. जपा. त्यासाठी आध्यात्मिक उपासनेकडे मन वळवलेत तर होणारा मनस्ताप खूपच सुसह्य होईल. मन व बुद्धी अस्थिर झाल्यामुळे अविचाराचे आचरण होण्याची शक्यता आहे. जपा. अकारण कोणाच्या आर्थिक जबाबदाऱ्या उचलू नका. आर्थिक येणे असेल तर त्यात अडथळे, घोटाळे, विलंब निर्माण होणे संभवते. या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना बढती, काहींना उच्च पद तर काहींना मनसन्मान मिळण्याची शक्यता आहे. पण उत्तरार्धात सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, कौटुंबिक वाद, भांडणे, स्वत:चे व इतरांचे अनारोग्य, आर्थिक समस्या अशापैकी काही कारणांनी सुखसमाधान लाभण्याची शक्यता दिसत नाही. असह्य मनस्तापामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार, मूळव्याध अशापैकी आजार होणे संभवते. मनासारखे काही घडत नसल्याने नैराश्य येणे शक्य आहे. अपघातभय, वीजभय, जलभय आहे . जपा.

**(११)** कुंभ **-** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अतिशय अस्थिर, चंचल, लहरी झाले असण्याची शक्यता आहे. असे असले तरीही त्यात भावनाप्रधानता अधिक असण्याची दाट शक्यता वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य येत असावे शिवाय हर्षलमुळे बुद्धीही थोडी विकृत झाली असून अविचाराचे आचरण होत असावे, असे वाटते. त्यामुळे घरच्या मंडळीशी वाद, भांडणे होत असतील. त्यातून शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होणेही संभवते. जपा. यावर उपाय म्हणजे जिभेला लगाम घाला, मनावर संयम ठेवा, सहनशील होऊन विचारपूर्वक आचरण करा. नपेक्षा अविचाराने खर्च व आर्थिक फ़सवणूक होणेही संभवते. जपा. असे आचरण झाल्यास त्याचा लाभ तुम्हांस

महिन्याच्या उत्तरार्धात झाल्यावाचून राहणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-गुरुच्या अनुकुलतेने शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना अपेक्षित अशा सुखसमाधान देणाऱ्या घटना घडतील. आरोग्य उत्तम राहील. प्रवासाचे योग येणे शक्य दिसते. तसेच या राशीच्या लेखकांचे लेखनही ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्याची शक्यता दिसते. पण भावंडात दुरावा निर्माण होणार नाही, याची काळजी घ्या. शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखात येणाऱ्या बाधा जाणवणार नाहीत. घरात आनंदी वातावरण राहील. बागाईत शेती व्यवसाय असणारांना भरपूर लाभ होईल. पण वैवाहिक जीवनात मतभेद, वाद, जीवनसाथीचे अनारोग्य अशापैकी कारणांनी सुखसमाधानात बाधा येणे संभवते. जपा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात प्रथम सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक समस्यांकडे विशेष लक्ष देणे अगत्याचे होईल. त्यासाठी प्रथम आपला स्वभाव, मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण होणे आवश्यक आहे. तरच शारीरिक, मानसिक आरोग्य चांगले राहू शकेल. अध्यात्मात रस असेल तर गुरु दत्तात्रेयाच्या उपासनेतून सात्विक सुखशांती लाभू शकेल व गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने प्राप्त होणाऱ्या विविध लाभांचा आनंद अनुभवू शकाल. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील. नोकरीत प्रगती व व्यवसायात वाढ होईल. त्यातून अर्थलाभही होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित शास्त्रीय संशोधन नोकरी,व्यवसाय, औषधविक्रेते, तसेच सर्व प्रकारचे कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लहान मुलांकडे त्यांच्या पालकांनी विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. मुलांपैकी कोणाच्या गंभीर आजारामुळे वा अन्य समस्येमुळे संततिसुख लाभेलसे दिसत नाही. जपा. महिन्याचा उत्तरार्ध फ़ारसा अनुकुल होणार नाही, याचे भान ठेवून जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधण्याचा अटोकाट प्रयत्न करा. .

=====00000=====